# जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसेने कळविण्यात येते की, विभागीय कार्यालय, बुलडाणा, उपविभागीय कार्यालय,मलकापूर येथील खालील अनुसुचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे जमिन धारकाची जमिन मा.राज्यपाल महाराष्ट्र शासन यांचे नावे जलसंपदा विभागाचे प्राधिकृत प्रतिनिधी कार्यकारी अभियंता, बुलडाणा पाटबंधारे विभाग, बुलडाणा व सहायक अभियंता श्रेणी-१ व्याघ्रा नाला कालवा उपविभाग मलकापूर राहेरा संग्राहक लघु पाटबंधारे योजना ता. मोताळा जि. बुलडाणा योजनेच्या बुडीतक्षेत्रामुळे बाधित राहेरा गावाचे पुनर्वसनाकरीता आवश्यक वाढीव जमिन सन २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार २६ ते ३० मुद्दे ,महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग , शासन निर्णय क्रमांक संकिर्ण ०३/२०१५ /प्र.क्र.३४/अ-२ दि. १२/०५/२०१६ चे मार्गदर्शन तत्वे, महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग शासन निर्णय क्रं. संकीर्ण (०३/२०१५) प्रक्र ३४/अ-२/ दिनांक ३०/०८/२०१६ सुधारीत मार्गदर्शक तत्वे व महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग, शासन निर्णय क्रं. संकीर्ण एल क्यु -१/२०१७/प्रक्र१२/अ-२/दिनांक २५/०१/२०१७ अन्वये खाजगी जमिन वाटाघाटीने/ व्यवहाराने सार्वजनिक प्रयोजनासाठी /संपादन /सरळ खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.

खालील अनुसुचीमध्ये संबधित मालकाचे नांव गट क्रमांक व संपादन करावयाचे क्षेत्र इत्यादी तपशिल दिला आहे. सदर जमिनीबाबत हिश्यावर हक्क हितसंबंध, दत्तकपुत्र वारसाहक्क गहाण, दान बोजा, बाकी, लिज,कर्ज बक्षीसपत्र, जप्ती, करारमदार व इतर असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आत पुराव्यानिशी लेखी तक्रार कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० पर्यत) उपविभागीय अधिकारी (महसुल) मलकापूर ता. मलकापूर जि. बुलडाणा या कार्यालयास समक्ष अथवा रजिष्टर पोष्टाने इकडील कार्यालयास कळवावे तसेच नमुद केलेल्या पत्यावर सर्व कागदपत्रासह समक्ष येउन भेटावे व आपले असलेले हितसंबंधीत लेखी खात्री करुन घ्यावी. तसे न केल्यास कुणाचेही काही एक म्हणणे अगर हरकत नाही असे समजून तसेच सदरील मिळकतीवर कोणाचा काहीही व कोणत्याही प्रकारे हितसंबंध नाही असे समजून सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करुन व त्यानंतर  येणा-या हरकती आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

Scanned by CamScanner

मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरहू जमिन मालकाची मिळकत निर्वेध व निर्जोखमी असल्याचे समजून इकडील कार्यालय महाराष्ट्र शासन यांचेवतीने मुदतीनंतर केव्हाही खरेदीचा व्यवहार पूर्ण करेल. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आल्यास ती या कार्यालयास कायदेशीररित्या बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. ही खरेदीपूर्व नोटीस दिली.

दिनांक / /२०१७

अनुसूची राहेरा संग्राहक लघु पाटबंधारे योजना मौजा राहेरा ता. मोताळा जि. बुलडाणा मधील सरळ खरेदीव्दारे संपादन करावयाच्या जमिनीचा तपशील.

| अ.क्र. | जमिन मालकाचे नांव | शिवार | गट क्रमांक | एकुणक्षेत्र हे. आर | खरेदी/संपादन करावयचे क्षेत्र हे. आर |
|---|---|---|---|---|---|
| १ | निलेश खुशाल रायपुरे | राहेरा | १५ | १.९१ | ०.५४ |

सहायक अभियंता श्रेणी-१
व्याघ्रा नाला कालवा
उपविभाग मलकापूर

कार्यकारी अभियंता
बुलडाणा पाटबंधारे विभाग
बुलडाणा

सदरील नोटीस आमचे माहीतीवरुन, विनंतीवरुन, कागदपत्रावरुन, अधिकारावरुन प्रसिध्द केली असे.

ॲड श्री. डी. डब्लु. मुंदे
बुलडाणा जि. बुलडाणा

Scanned by CamScanner